# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**( परीक्षा विभाग )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३१०४

जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/११८२/२०१५ — दि. १८/०६/२०१५

## प्रवेशासंबंधी सुचना

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयातील प्राचार्य व विद्यार्थी तसेच संबंधीतांना सुचित करण्यात येते की, पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमच्या प्रवेशासंबंधी विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०१५–१६ चे **Academic Calender** संदर्भ क्रं. **No./GUG/ACAD/A.C./२२८/२०१५,** दिनांक ०६/०४/२०१५ नुसार विविध अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेश घेण्याची प्रक्रिया संगणकीय **Online** प्रणालीद्वारे **MKCL** कडून **Link** उपलब्ध करण्यात येत असून प्रथम सेमीस्टर करीता पहिल्या टप्प्यातील प्रवेश देण्याची प्रक्रिया दिनांक ०६ ऑगस्ट २०१५ पर्यंत पूर्ण करावे.

## महाविद्यालयाना आवश्यक सुचना

१) प्रथम सेमीस्टर करीता प्रवेश देत असतांना अभ्यासक्रम निहाय विषय पुर्ण व अचूक आहेत किंवा नाही याची खात्री करावी.

२) विद्यार्थी/विद्यार्थीनीचे पूर्ण नाव, (इंग्रजी व मराठी) आईचे नाव, जन्म तारीख, जात, लिंग, माध्यम, मों. नंबर व पत्ता, याची अचूक नोंद करावी.

३) प्रवेश देतांना सेमीस्टर निवड तसेच शैक्षणिक वर्ष बरोबर नोंदवावे.

४) पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता इतर विद्यापीठाचे स्थानांतरण प्रमाणपत्र व या विद्यापीठाचे योग्यता प्रमाणपत्र स्विकारून व पडताळणी करून विद्यार्थ्यांचे प्रवेश महाविद्यालयात निश्चित करण्यात यावा.

५) अभ्यासक्रमानुसार मंजुर प्रवेश क्षमते ऐवढाच देण्यात यावा मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील.

६) प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या काही कारणास्तव प्रवेश रदद् करावयाचा असल्यास नामांकन करण्यापुर्वीच विद्यार्थ्यांचे विनंती अर्ज व प्राचार्यांच्या स्वाक्षरीचे पत्र सादर करून विद्यापीठाकडून प्रवेश रदद् करून घ्यावा.

७) प्रवेश देतांना विद्यापीठाच्या निर्देशानुसारच आवश्यक कागदपत्राची (Documents) तपासणी करून नियमानुसार अभ्यासक्रमामध्ये प्रवेश देण्यात यावे. चुकीचे प्रवेश देण्यात आल्यास याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील यांची नोंद घ्यावी.

उपकुलसचिव,(परिक्षा पुर्व)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.